| Publication : Deshonnati | Date : 04.11.2015 |
|---|---|
| Edition : Nagpur | |

# बजाज अलियान्झ जनरल इन्शुरन्स नागपूर विभागात १० कार्यालये

**नागपूर :** बजाज अलियान्झ जनरल इन्शुरन्सच्या माध्यमातून नागपूर व लगतच्या जिल्ह्यात १० व्हर्च्युअल कार्यालये उघडण्यात येणार आहेत. यात भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, हिंगणा, कामठी, काटोल, पुसद, उमरेड, वर्धा या शहरांचा समावेश आहे. पहिल्या टप्प्यात देशभरात तीनशेवर व्हर्च्युअल कार्यालये उघडण्यात आली आहेत. एका टॅबलेटवर संपूर्ण कार्यालय उपलब्ध असून विम्याचा संपूर्ण व्यवहार डिजीटल होऊ शकतो.

याविषयीची माहिती पत्रपरिषदेत कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक, सीईओ तपन सिंघल यांनी दिली. ज्या विभागांना टियर टू, थ्री शहरांमध्ये प्रतिनिधित्त्व मिळत नाही त्यांच्यापर्यंत ही कार्यालये सुरू करण्यात आली आहेत. विमा जारी करणे, पॉलिसीचे पुनर्नूतनीकरण, भुगतान स्वीकार, दावा नोंदणी आदी गोष्टी एका ॲप्लिकेशनमधून करता येतात. यामुळे कंपनीला घोटाळे कमी करण्यासोबतच जोखीम कमी करणे सोपे झाले आहे. पूर, वादळ, नैसर्गिक आपत्तीतील १ हजार कोटींचे दावे कंपनीने दिल्याची माहिती दिली. अद्यापही ७५ टक्के दुचाकी मालक विम्याबाबत दुर्लक्ष करतात याकडे त्यांनी लक्ष वेधले. बजाज अलियान्झ जनरल इन्शुरन्स, अलियान्झ एसई, जगातील अग्रेसर विमा कंपनी आणि बजाज फिन्सर्व्ह लि.चा संयुक्त उपक्रम आहे. २००१ पासून कंपनी वाहन विमा, गृह विमा, आरोग्य विमा, पर्यटन विमा, विवाह विमा, इव्हेंट, चित्रपट विमा आदी विविध क्षेत्रात ग्राहकांच्या गरजेनुसार सुविधा पुरवित आहे. यावेळी झोनल मॅनेजर चेतन प्रकाश, ब्रँच मॅनेजर निरंजनकुमार सिंग आदी उपस्थित होते.